Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

UGC Approved Monthly Journal

VOL-IV | ISSUE-X | Oct. | 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
UGC Approved Sr.No.64259
Vol - IV Issue-X OCTOBER 2017 ISSN 2349-638x Impact Factor 3.025

# वित आयोग आणि स्थानिक स्वराज्य संस्था

**प्रा.ए.एच. भोंडवे**
दादा पाटील महाविद्यालय कर्जत
ता.कर्जत जि. अहमदनगर

**प्रा.डॉ. संहिता आठवले**
टी. जे. कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, खडकी, पुणे

**सारांश :**

भारतासारख्या खंडप्राय देशात ग्रामीण भगात दर्जेदार पायाभूत सुविधा पुरविणे अवघड आहे. ग्रामीण भागाचा विकास झाल्याशिवाय भारताचा विकास होणार नाही. स्थनिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण विकास साधला जावू शकतो हे सरकारच्या लक्षात आल्यानंतर १९९३ मध्ये ७३ वी घटनादुस्ती करण्यात आली. ७३ व्या घटना दुरूस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला तसेच आर्थिक अधिकार दिले. परंतु स्थानिक स्वराज्य संस्था मुळातच आर्थिकदृष्टया कमकुवत असल्याने त्या कार्यक्षमपणे कार्य पार पाडू शकत नव्हत्या.१० व्या वित्त आयोगानंतरच्या वित्त आयेगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उत्पन्नात वाढ व्हावी म्हणून केंद्रीय वित्त अयोगात अनुदानाची शिफारस केल्याने या संस्थांची आर्थिक परिस्थिती सुधारत आहे.संध्याच्या १४ व्या वित्त आयोगाने विशेषता ग्रांमपंचायतीसाठी महत्वपूर्ण शिफारशी केल्याने ग्रामपंचायतीचे ख-या अर्थाने अच्छे दिन आले आहेत

**प्रस्तावना**

भारत स्वतंत्र झाल्या नंतर भारतात संघराज्य शासन पदधतीचा स्विकार करण्यात आला. केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यातील वित्तीय संबंधांचा अभ्यास करून केद्राकडून राज्यसरकारानां कोणत्या तत्वानुसार निधींचे हस्तांतरण करावे.यासाठी भारतीय राज्यघटनेच्या २८० व्या कलमा नुसार वित्त आयेगाची स्थापना करण्यात आली. जलद आर्थिक विकास घडवून आणन्याचा प्रयत्न करणा-या भारतासरख्या संघराज्यात वित्त आयोगाच्या भूमिकेला महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.राष्टपती दर ५ वर्षांनी वित्त आयोगाची नेमणूक करतात.१९५१ पासून आत्तापर्यंत १४ वित्त आयोग स्थापन करण्यात आले परंतू १० व्या वित्त आयोगा पर्यत कोणत्याही वित्त आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थाविषयी शिफारशी केलेल्या नाहीत.या नंतरच्या सर्व वित्तआयोगांनी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी महत्वपूर्ण शिफारशी केल्या आहेत.

ग्रामीण भागात संत्तेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी आणि पंचायत राज व्यवस्थेला घटनात्मक दर्जा देण्यासाठी २० एप्रिल १९९३ रोजी पंचायत राज व्यवस्थेस घटनात्मक दर्जा मिळाला ७३ व्या घटना दुरूस्ती ने भारतीय राज्यघटनेत ११ वी अनुसुचि समाविष्ट केली असून त्यात स्थानिक स्वराज्य संस्थेकडे २९ विषय सोपविण्यात आले आहेत.त्यामूळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्य व जबाबदारी मोठयाप्रमाणावर वाढ झाली आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांची जबाबदारी यशस्वी पणे पारपाडतायावी म्हणून १९९५ ते २००० या कालावधी साठी स्थापन करण्यात आलेली १० व्या वित्त आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी शिफारशी केल्या त्यानंतरच्या सवर्च वित्त आयोगांनी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे अनुदानाचा ओघ वाढविला आहे.सद्याच्या १४ व्या वित्त आयोगाने तर ग्रामपंचायतीसाठी विशेष शिफारशी केल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्व

व जबाबदारी वाढली आहे.स्थानिक स्वराज्य संस्था अर्थिक दृष्टया सक्षम होउन त्यांची कार्य क्षमता वाढण्यास मदत होत आहे.

**उद्देश :**

१) भारतातील स्थनिक स्वराज्य संस्थांच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

२) चौदाव्या वित्त आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी केलेल्या शिफारशींचा अभ्यास करणे.

**भारतातील पंचायत राजची सद्यस्थिती**

स्थानिक स्वराज्य संस्था हा राज्यसरकारच्या अधिकार क्षेत्रातील विषय आहे त्यामुळे काही राज्यात व्दिस्तरीय तर काही राज्यात त्रिस्तरीय स्थानिक स्वराज्य संस्था आहेत.पुढील तक्त्यात भारतातील पंचायत राज संस्थांची सद्यस्थिती दर्शविलेली आहे.

| अ.नं. | राज्य/केंद्रशाशीत प्रदेश | जिल्हा परिषद | पंचायत समित्या | ग्रामपंचायत |
|---|---|---|---|---|
| १ | आंदमान व निकोबार बेट | ३ | ९ | ७० |
| २ | आंध्रप्रदेश | १३ | ६६० | १२९२० |
| ३ | आरूनाचल प्रदेश | २० | १७६ | १८२८ |
| ४ | आसाम | २१ | १९१ | २१९२ |
| ५ | बिहार | ३८ | ५३४ | ८३९८ |
| ६ | चंदिगड | ०१ | ०१ | १२ |
| ७ | छत्तीसगड | २७ | १४६ | १०९८९ |
| ८ | दादरनगर हावेली | १ | अपात्र | २० |
| ९ | दमन व दिव | २ | अपात्र | १४ |
| १० | गोवा | २ | अपात्र | १९१ |
| ११ | गुजरात | ३३ | २२३ | १४०६२ |
| १२ | हरियाणा | २१ | १२६ | ६२०५ |
| १३ | हिमाचल प्रदेश | १२ | ७७ | ३२२८ |
| १४ | जम्मू आणि काश्मिर | २२ | ३२२ | ४३४१ |
| १५ | झारखंड | २४ | २६३ | ४३९८ |
| १६ | कर्नाटक | ३० | १७६ | ६२२ |
| १७ | केरळ | १४ | १५२ | ९४१ |
| १८ | लक्षव्दिप | ०१ | अपात्र | १० |
| १९ | मध्यप्रदेश | ५१ | ३१३ | २२८२५ |
| २० | महाराष्ट्र | ३४ | ३५१ | २८०३१ |
| २१ | मनिपूर | ०४ | अपात्र | १६१ |
| २२ | ओडीसा | ३० | ३१४ | ६६६३ |
| २३ | पांडेचरी/ पुदेच्चेरी | अपात्र | १० | ९८ |
| २४ | पंजाब | २२ | १४७ | १३०४७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २५ | राजस्थान | ३३ | २९५ | ९८९४ |
| २६ | सिक्कीम | ०४ | अपात्र | १७६ |
| २७ | तमिळनाडू | ३१ | ३८५ | १२५२४ |
| २८ | तेलंगना | ०९ | ४३८ | ८६९५ |
| २९ | त्रिपुरा | ०८ | ३५ | ५९१ |
| ३० | उत्तराखंड | १३ | ९५ | ७९५६ |
| ३१ | उत्तर प्रदेश | ७५ | ८२१ | ५९०२६ |
| ३२ | पश्चिम बंगाल | १९ | ३४१ | ३३४२ |
| | एकूण | ६१८ | ६६०१ | २४८८७० |

वरील तक्त्यात भारतातील पंचायत राज संस्थामधील राज्यनिहाय जिल्हा परिषदा पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदांची संख्या दर्शविली आहे.भारतात ६१८ जिल्हा परिषदा आहे.त्यापैकी महाष्ट्ररत ३४ जिल्हा परिषदा आहेत.उत्तर प्रदेश या एकाच राज्यात ७५ एवढया सर्वाधिक जिल्हा परिषदा आहेत त्यानंतर २ क्रमांकावर मध्यप्रदेशमध्ये ५१ जिल्हा परिषदा आहेत.भारतात पंचायत समित्यांची संख्या ६६०१ ऐवढी आहे.उत्तर प्रदेशमध्ये सर्वाधिक ८२१ पंचायत समित्या आहेत महाराष्टात ३५१ (भारताच्या ५.३१ टक्के) पंचायत संमित्या आहेत.

भारतात एकूण ग्रमपंचायतीची संख्या २४८८७० आहे.भारतात सर्वाधिक ग्रमपंचायती असणारे राज्य उत्तर प्रदेश असून त्यानंतर महाराष्टाचा दुसरा क्रमांक लागतो.महाराष्टात भारतातील एकूण ग्रमपंचायती पैकी ११.२६ टक्के ग्रामपंचायती असून त्यांची संख्या २८०३१ आहे उत्तर प्रदेश मध्ये ५९०२६ ग्रमपंचायती आहेत.तर मेघालय मिझोरम व नागालॅड येथे परंपरागत कॉन्सिल आहेत.

**वित्त आयेगाची भमिका**

वित्त आयोगाची स्थानिक स्वरात्य संस्थांच्या उत्पन्नात वाढ करण्यात महत्वाची भूमिका आहे. रात्यातील राज्य वित्त ओयोगानी (सीए.फ.सी) केलेल्या शिफारशींच्या आधाराव राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संसाधनात वाढ व्हावी म्हणून राज्याच्या संचित निधीत वाढ करण्यासाठी शिफारशी कारणे ही भूमिका केंद्रीय वित्त आयोगाचि असते.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संसाधनात वाढ व्हावी त्यांनी अनुदाने कशापदधतिने दयावी व राज्य सरकारांनी कोणत्या उपाय योजना कराव्या.या दोन्ही संदर्भात वित्त आयोग शिफारस करतो.

**वित्त आयोगांची स्थानिक स्वराज्य संस्थाविषयी दृष्टीकोन**

**दहावा वित्त आयोग**

दहाव्या वित्त आयोगाच्या विचारार्थ विषयात स्थानिक स्वरात्य संस्था हा विषय नाही परंतू ७३ व्या घटना दुरूस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थांचे कार्य व अधिकारात वाढ केली हि नविन जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांना समर्थ पणे पार पाडता यावी. म्हणून या आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांविषयी शिफारशी केल्या ११ व्या वित्त आयोगा नंतरच्या सर्व वित्त आयोगांनी राज्य वित्त अयोगाच्या शिफारशी विचारात घेउन शिफारशी केल्या आहेत.

१० व्या वित्त आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी ४३८०.९३ कोटी रू.ची शिफारस केली होती. १९७१ च्या जनगणेच्या आधाराच्या ग्रामिण जनतेच्या प्रतिव्यक्ती १०० रू प्रमाणे अनुदान देण्याची शिफारस केली राज्य सरकारांनी ग्रामिण भागाच्या विकासासाठी उपयुक्त योजना तयार करून

स्थानिक स्वराज्य संस्थांना हा निधी खर्च करण्यासाठी मार्गदर्शन केले पाहिजे अशी शिफारस १० व्या वित्त आयोगाने केली या वित्त आयेगाच्या शिफारशी नूसार १९९५ ते २००० या कालावधीत राज्यांना रू.३५७६ .३५ कोटी हस्तांतरीत करण्यात आले

**आकरावा वित्त आयोग**

आकराव्या वित्त आयेगाने २००० ते २००५ या कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थासाठी रू ८००० कोटींची शिफारस केली होती.या पैकी काही निधी स्थानिक स्वराज्य संस्थांची खाती व अंकेक्षणासाठी राखीव असावा व उर्वरीत निधी पाणीपुरवठा स्वच्छता,स्मशाणभूमी,कबरस्थान यांची देखभाल प्राथमिक शिक्षण ,आरोग्य देखभाल,यासाठी वापरला जावा ११ व्या वित्त आयेगानुसार २००० ते २००५ या कालावधीत राज्य सरकारांना ६६०१.८५ कोटी रू अनुदान स्वरूपात देण्यात आले होते.

**१२ व्या वित्त आयोग**

१२ व्या वित्त आयोगाने २००५ ते २०१० या कालावधी साठी २००००कोटी रू ची शिफारस केली होती.पंचायतराज नेमलेल्या समितिच्या शिफारशी नुसार हे अनुदान देण्यात आले होते.पंचायत राज संस्थांना उत्पन्नाचे सोपे व विना अट साधन निर्माण व्हावे म्हणून हि समिती नेमली होती.हा निधी पाणीपुरवठा व स्वच्छेतेला प्राथमिकतेसाठी वापरण्यात येणार होता. हा निधी स्थानिक स्वराज्य संस्थांना हस्तांतरीत करण्याचे कार्य राज्य संरकारकडे सोपविण्यात आले होते.या शिफारशी नुसार वित्त मंत्रालयाने ३१ मार्च २०१० पर्यत १८९२६.७९ कोटी रू (९४.५ टक्के) राज्य सरकारकडे हस्तांतरित करण्यात आली.

**१३ वा वित्त आयोग**

१३ व्या वित्त आयेगाने पंचायत राज्य संस्थांना २०१० ते २०१५ या पाच वर्षासाठी ६३०५० कोटी रू आनुदान देण्याची शिफारस केली.५ व्या ६ व्या अनुसुचितील क्षेत्र आणि सविधानातिल ९ वी आणि ६ क भागातील सुटलेल्या क्षेत्रासाठी अनुदान काळातील एकून मुल अनुदानातूल प्रति व्यक्ति २० रू विशेष अनुदान देण्याची शिफारस केली आहे .याक्षेत्राासाठी राज्यांकडून २०११—१२ साठी प्रति व्यक्ति १० रू आणिा त्या नंतरच्या तीन वर्षासाठी २० रू अनुदान देण्याची शिफारस करण्यात आली होती.अर्थ मंत्रालयाच्या मर्गदर्शक तत्वानुसार आणि १३ व्या वित्त आयोगाच्या शिफारशी नुसार घटक राज्यांना काही अटींवर अनुदाचे हस्तांतर करण्यात आले. राज्यांमध्ये निवडून दिलेल्या पंचायती असाव्यात त्यानी उपयागिता प्रमाणपत्र जमा केलेले असावे पंचायतींच्या लेखापरिक्षणासाठी नियंत्रक व लेखा परिक्षकाची नेमणूक करावी.या सारख्या अटी घालण्यात आल्या होत्या.

**१४ वा वित्त आयोग**

२०१५ ते २०२० या पाच वर्षाच्या कालावधीत शिफारशी करण्यासाठी १४ व्या वित्त आयोगाची स्थापना २०१३ मध्ये डॉ.वाय.व्ही रेडडी यांच्या अध्यक्षेखाली करण्यात आली. १४ व्या वित्त आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांन विषयी विशेषतः ग्रामपंचायती साठी महत्व पूर्ण शिफारशी केल्या आहेत.

१४ व्या वित्त आयोगाच्या मते राज्यानां अनुदान लोक संख्या जनगणनेच्या आधारावर ९० टक्के व क्षेत्र.फळास १० टक्के भार असावा राज्य सरकारांनी तो स्थानिक स्वरात्य संस्थांकडे हस्तांतरीत करताना २०११ च्या जनगणने नुसरा शहरि व ग्रामीन लोकसंख्यच्या प्रमाणात करावा.

२०१५ ते २०२० या कालावधी साठी रू २८७४३६ कोटींची मागणी केली आहे.जी सरासरी प्रति व्यक्ती वर्ष रू ४८८ येथे त्यामध्ये पंचायतीसाठी २००२९२.०२ आणि नगर पालिकांसाठी ८७१४३.०८ कोटीची अनुदानाची शिफारस केली आहे. प्रत्येक राज्याला प्रति वर्षी विशिष्ट रक्कम हस्तांतरीत केली जाईल ग्रामपंचायतीना मिळणा-या अनुदाना पैकी मुळ अनुदान ९० टक्के आणि १० अनुदान निश्पादान अनुदान म्हणून देण्यात येईल तर नगरपालीकांना देण्यात येणारे अनुदानाचे हेच प्रमाण ८०:२० असे असणार आहे.

चौदाव्या वित्त आयोगाने ग्रमपंचायतीसाठी अत्यंत महत्वपूर्ण शिफारस केली आहे ती म्हणजे आयोगाने शिफारस केलेले अनुदान केवळ ग्रांपंचायतीनांच मिळावे त्या मध्ये इतर कोणत्याही संस्थेचा हिस्सा असणार नाही.कारण ग्रामपंचायत हीच प्रत्यक्ष जनतेला सेवा सुविधा पुरविण्यासाठी जबाबदार आहे.राज्य सरकारकडून ग्रामपंचायतीकडे अनुदानाचे हस्तातंरण करताना राज्य वित्त आयोगाच्या शिफारशी नुसार केले जाई इतर संस्थांच्या गरजा राज्यसरकारकडून भागविल्या जातील
ग्रामपंचायतीनां दिले जाणारे अनुदान प्रत्येक वर्षी जुन ते ऑक्टोबर च्या दरम्यान दिले जाईल त्यामुळे ग्रामपंचायती विकास कामाचे नियोजन योग्य पदधतिने करू शकतिल केंद्र सरकारणे दिलेले अनुदान राज्य सरकारांनी १५ दिवसाच्या आत ग्रमपंचायतीकडे हस्तांतरी करावे तसे न केल्यास राज्य सरकारकडून व्याजासहीत त्याची वसूली करण्यात येईल.

स्थानिक स्वराज्य संस्थांना दिलेल्या मुळ अनुदानाचा योग्य वापर करावा यासाठी त्यांना प्रत्साहन म्हणून निश्पादन अनुदान देण्याची शिफारस आयोगाने केली आहे.ज्या ग्रांपंचायतीनी १) त्यांचे उत्पादन व खर्चा संबंधि विश्वनिय आकरेवाडी उपलब्ध करून दिली आहे आणि २) आपल्या राज्यस्वात वाढ केली आहे अशा ग्रामपंचायतीना हे अनुदान देण्यात येणार आहे.यामुळे ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात व प्रशासनात सुधारना होणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांना वेगवेगळया स्त्रोतांपासून मिळालेले अनुदान लेखाप्रशिक्षण करताना वेगवेगळी मांडावी त्यांची तपासनी ऑडिटर कडून करावी ज्या संस्था ऑडिट वेळेत करणार नाहीत त्यांच्यावर कर्यवाही करण्याचे १४ व्या वित्त आयोगाने सुचविले आहे.त्यांना दिले जाणारे अनुदान मुलभूत (राज्यघटनेत नमुद केलेल्या २९ विषयांवर ) सेवांसाठीच खर्च करावे पाणी पुरवठा स्वच्छता दिवा बत्ती यासारख्या मुलभूत पायाभूत सुविधांसाठीच या अनुदानाचा वापर करण्यात येणार आहे. पुढील तक्त्यात १४ वित्त आयोग्याच्या शिफारशी नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात येणारे अनुदान दर्शविले आहे.

**महाराष्टा १४ व्या वित्त आयोगाकडून मिळणारे अनुदान** (कोटी रू मध्ये )

| **वर्ष** | **ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था** | | **एकूण** |
|---|---|---|---|
| | मुळ अनुदान | कार्या नुसार अनुदान | (मुळ कर्यानुसार ) |
| **२०१५–१६** | १६२३.३२ | | १६२३.३२ |
| **२०१६–१७** | २२४७.७७ | २९४.८४ | २५४२.६१ |
| **२०१७–१८** | २५९७.१० | ३३३.६६ | २९३०.७६ |
| **२०१८–१९** | ३००४.३७ | ३७८.९१ | ३३८३.२८ |
| **२०१९–२०** | ४०५९.५५ | ४६९.१५ | ४५२८.०७ |
| **एकूण** | १३५३२.११ | १५०३.५७ | १५०३५.६८ |

**आलेख क्र.१**




संदर्भ :- तक्ता क्र २

स्थानिक स्वराज्य संस्थाना दिल्या जाणा-या एकूण अनुदानात महाराष्टाचा तिसरा क्रमांक आहे.महाराष्टातील स्थानिक स्वराज्य संस्थांना एकूण अनुदानाच्या ७.५० टक्के अनुदान मिळणार असून त्याची रक्कम १५०३५ .६८ कोटी रू आहे.२०१५ –१६ पासून २०१९ –२० पर्यत अनुदानात वाढ होताना दिसते.वित्त आयोगाने स्थानिक स्वराज संस्थाना २०१५– २०२० या कालावधीसाठी रू २००३१२.२ कोटींची शिफारस केली आहे.या पैकी मुळ अनुदान १८०२८२.९८ कोटी रू तर कार्यानुसार अनुदान २००२९.२२ कोटी रू आहे.म्हणजे १४ व्या वित्त आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांना दिलेल्या एकूण अनुदाना पैकी ९० टक्के अनुदान मुळ तर १० टक्के कार अनुदान निश्पादन किंवा कार्यानुसार अनुदान दिले जाणार आहे.
वरील आकडे वाडीच्या साहायाने पुढील आलेखात राज्यावार अनुदान दर्शविले आहे.

**आलेख क्र. २**




संदर्भ :तक्ता क्र. १

वरील आलेखात १४ व्या वित्त आयोगाने भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांना दिलेल्या राज्यावार अनुदान दर्शविले आहे.म्हणून एकूण अनुदाना पैकी सर्वाधिक १७.८६ टक्के हिस्सा उत्तर प्रदेश चा आहे. एकूण अनुदाना पैकी ३५७७६.५६ कोटी रू उत्तर प्रदेशातील स्थानिक स्वराज्य

संस्थांना मिळणार आहे.बिहारचा अनुदान मिळवण्यात दुसरा क्रमांक असून एकूण अनुदानापैकी २१०१७.८३ कोटी (१०.४९टक्के) बिहार मधील स्थानिक स्वराज्य संस्थांना मिळणार आहे. तर महाराष्टाचा तिसरा क्रमांक आहे. महाराष्टातील स्थानिक स्वराज्य संस्थांना एकूण अनुदानाच्या ७.५० टक्के अनुदान मिळणार असुन त्याची रक्कम १५०३५.६८ कोटी रू आहे.मघालय मिझोरम आणि नागालॅड या राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था नसल्याने या राज्यांना अनुदान मिळणार नाही.

**चौदावा वित्त आयोग आणि महाराष्ट**

चौदावा वित्त आयोगाकडून महाराष्टातील स्थानिक स्वराज्य संस्थांना मिळणा–या अनुदान पुढील तक्त्यात दर्शविले आहे.

**संदर्भ सुचीः**

1. http:/lgdirectiry .hov.in, Local Government Directory,Rrpot Printed on 31/01/2017
2. http://panchayat.gov.in
3. Fincominindia,nic.on
4. 14 Finance Comminission,Part - I Topic -09, Page no 90 to 121.
5. पंचायतराज मंत्रालय, भारत सरकार, वार्षिक रिपोर्ट - २०१५ — १६ पान नं. २४ ते ३१
6. डॉ. सौ. निर्मल भालेराव, भारतीय अर्थव्यवस्था निराली प्रकाशन, आवृती ११ वी जानेवारी २०१४ पान नं. ६५.१ ते ६५.३४
7. प्रा. राजेंद्र रसाळ, भारतीय अर्थवस्था सक्सेस पब्लिकेशन अवृती तीसरी २०१२ पान नं ९६९ ते ९९०